MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

## गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीपात्रात वाळू माफियांनी घातला नंगानाच!

## महसूल आणि पोलीस पथके फक्त नावालाच; अवैध वाळू उपसा काय थांबेना?

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२५९ | मंगळवार दि.११ जुन २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -259 | TUESDAY DT. 11 JUNE 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## वाळू माफिया च्या विरोधात आंदोलन करणारे आ. लक्ष्मण पवार यांना वाळू माफियाचा नंगानाच दिसत नाही का.?



# कार्यकर्त्यांना पोसण्यासाठी नियमांना पायदळी तुडवणे सुरूच



डीवायएसपी नीरज राजगुरू हे स्वतः गेवराई शहरामध्ये फिरत असताना व ग्रामीण भागामध्ये फिरत असताना चकलांबा गेवराई तलवाडा या हत्ती मध्ये त्यांना कित्येक ट्रॅक्टर व हवाने कचाकच भरलेला असताना चोरी करून वाळू माफी आहे वाळू घेऊन जात असताना त्यांच्या डोळ्यात देखत गेले तरी त्यांचे कर्मचारी व संबंधित तिन्ही पोलीस स्टेशनचे अधिकारी असतील किंवा स्वतः दिवसभर असतील हे कधीही त्यांच्या विरोधामध्ये बोलत व गाडी उभा करण्यामध्ये हिम्मत सध्यातरी चकलांबा, गेवराई, तलवाडा, व गेवराई, डि वाय एसपी नीरज राजगुरू यांचे अधिकारी कर्मचारी वाळू माफीयाना अडविण्याची हिंमत करत नाहीत. हे मात्र नक्कीच जनतेला दिसून येत आहे.

**गेवराई : गेवराई तालुक्यात वाळू माफियांनी प्रचंड हैदोस घातला असून तालुक्यातून जाणाऱ्या गोदापात्रातून दररोज हायवा, ट्रॅक्टर ने अवैध वाळू उपसा करून वाहतूक होत आहे. यामुळे शहर व ग्रामीण भागातील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात चाळण झाली आहे. या वाळू माफियांना महसूल व पोलिसांचा आशीर्वाद असल्याने राजरोसपणे वाळूचोरी सुरू आहे. यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूलही बुडत आहे.**

प्रशासनातील हप्तेखोर कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनमुळे, वाळू माफिया बेलगाम झाले आहेत. आणि यामुळेच अनेकांना आपला जीव गमवावा लागतोय. वाळूच्या भरधाव वाहनाने चिरडून आतापर्यंत अनेक जणांचा बळी गेला आहे. तर कुठे वाळूसाठी खोदलेल्या खड्ड्यात बुडून जीव जातोय. मात्र याचं कोणतचं सोयरसुतक बेलगाम असणाऱ्या वाळू माफियांना आणि निर्ढावलेल्या अधिकाऱ्यांना पडत नाही. तर हे सर्व तहसीलदार संदीप खोमणे व गेवराईचे डिवायएसपी नीरज राजगुरू यांच्या वरदहहस्तातून सुरू असल्याची दबक्या आवाजात चर्चा केली जात आहे.

गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीपात्रात वाळू माफियांनी अक्षरशः नंगानाच सुरू केला आहे. काही दिवसांपूर्वी चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाळू माफियांनी पोलीस कर्मचाऱ्याच्या अंगावर हायवा घालण्याचा प्रयत्न केला होता. तसेच न्यायाधीश यांच्या गाडीला कट मारणे असे अनेक घटना घडल्या असताना डीवायएसपी नीरज राजगुरू हे गप्प का आहेत? हा प्रश्न निर्माण होत आहे.

शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवून चोरट्या मार्गाने वाळू वाहतूक वाळू साठ्याचा गोरखधंदा गेवराई तालुक्यात सध्या फोफावताना दिसत आहे. तालुक्यातील गुंतेगाव, राक्षसभुवन, माळसपिंपळगाव, बोरगाव, सावरगाव, गुळज, हिंगणगाव, गंगावाडी, भोगलगाव, जोगलादेवी आदी ठिकाणाहून दररोज अवैधरीत्या वाळूची मोठ्या प्रमाणावर राजरोस चोरटी वाहतूक करण्यात येत आहे. या चोरट्या वाहतुकीकडे संबंधित महसूल विभाग व गेवराई चे डीवायएसपी नीरज राजगुरू हे दुर्लक्ष दुर्लक्ष करत असल्यामुळे माफियांचे फावत आहे. परिणामी शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडवून नुकसान होत आहे. याच अवैध वाहनांच्या सुसाट वेगामुळे अनेकांना आपले प्राणही गमावावे लागले आहेत. विनाक्रमांक धावणाऱ्या हायवा ट्रकमधून ही चोरटी वाळू वाहतूक सुरू आहे. माफियांच्या वाढत्या दहशतीमुळे तसेच प्रशासकीय अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या मधुर संबंधामुळे सर्वकाही सुरळीत सुरू असल्याची खंत गोदाकाठच्या परिसरातील नागरिकांतून व्यक्त होत आहे.

गेवराई तालुक्यात वाळूमाफियांची दलालांनी सर्वोच्च यंत्रणा मॅनेज केली आहे. यामध्ये नदी पात्रांचे तर प्रचंड नुकसान होतच आहे. परंतु शासनाचाही कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. या सर्व प्रकरणाकडे बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मॅडम यांनी गांभीर्याने लक्ष घालून ही वाळूचोरी ताबडतोब थांबवावी, अशी मागणी नदीकाठच्या गावातील नागरिकांतून होत आहे. आता कारवाईकडे लक्षगेल्या अनेक वर्षांपासून वाळूची अवैध व अमाप उपसा सुरूच असून तक्रारी झाल्यानंतर थातुरमातूर कारवाई करून दंड वसूल केला जातो. ठोस स्वरुपाची कारवाई होत नसल्याने संपूर्ण परिसरातील ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. वाळूच्या भरधाव वाहनाने रस्त्यांची पुरती वाट लागली असून नदीपात्राचीही दैना उडत असून प्रशासन काय कारवाई करते, याकडे लक्ष आहे.



**वाळु माफिया अन् अधिकाऱ्यांच्या संगनमताने शासनाचा महसुल रसातळाला**

**वाळु माफियांचा हैदास गोर गरीबांच्या मुळावर**

आ. लक्ष्मण पवार आता वाळूमाफियाच्या विरोधात बोलणं बंद का केलं सांगतील का.?


आ. लक्ष्मण पवार यांचे कार्यकर्तेच वाळू माफी यांच्या यादीत.?


नीरज राजगुरू यांनी आजपर्यंत केलेल्या गेवराई मतदार संघातील अनेक वाळूमाफियांवरती कारवाया असतील तर ती माहिती जनतेपर्यंत नक्कीच डीएसपी निगज राजगुरू यांनी जनतेसमोर मांडावी.?

डीवायएसपी राजगुरू यांनी आजपर्यंत स्वतः रस्त्यावर उतरून गेवराईच्या वाळू माफियांना कधी चोप दिला आहे का माहित असेल तर सांगा?

गोदापात्रात नंगानाच करणाऱ्या वाळू माफीया ना पोसण्यासाठी डि वाय एस पी नीरज राजगुरूंचे पोलीस कर्मचारी पहाटे सहा वाजता गोदापात्रात एन्ट्री मारून सकाळी नऊ वाजता खिसा भरून परत निघतात?

गेवराई चे डीवायएसपी नीरज राजगुरू वाळू माफीयाना पोसण्यासाठी चकलांबा, गेवराई, तलवाडा, ठाण्याच्या प्रभारी यांना सूट दिली आहे का?






# राष्ट्रवादीचा काँग्रेस पार्टी अजित गटाकडुन २५ वा वर्धापन दिन देवणीत मोठ्या उत्साहात

देवणी ।लक्ष्मण रणदिवे

देवणी देवणी येथे लासोना चौकात देवणी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अजित गटाकडुन २५ वा वर्धापन दिन केक कापून साजरा करण्यात आला यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्याध्यक्ष अनिल कांबळे, अनिल रोटे देवणी तालुका सरचिटणीस, लक्ष्मण रणदिवे सामाजिक न्याय विभाग तालुकाध्यक्ष,

रामभाऊ मोरे, देवणी, पी आर सूर्यवंशी, मिलिंद वाघमारे , धनराज सांडूळे, काशीराम सूर्यवंशी, राजेंद्र सूर्यवंशी, शांताबाई सांडूळे,आदींची उपस्थिती होती, तसेच देवणी तालुक्यात राष्ट्रवादीचा काँग्रेस पार्टीचा वर्धापन दिन २५ वा वर्धापन दिन देवणी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची पदाधिकारी कडून मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आले.



# सुशीलाबाई वझरकर यांच्या मृत्यू

## कुटुंबियांनी त्यांच्या इच्छेनुसार केले देहदान

नांदेड ।संजीवकुमार गायकवाड

नांदेड येथील ज्येष्ठ नागरीक सेवानिवृत्त शिक्षीका सुशिलाबाई मधुकरराव वझरकर आज यांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या मुलांनी त्यांचा देह वैद्यकीय महाविद्यालयाला दान केला. पारंपारिक पध्दतीला वगळून घेतलेला हा निर्णय योग्य आहे. नांदेडमध्ये जिल्हा परिषदेमध्ये शिक्षीका या पदावर कार्यकरून सुशिलाबाई मधुकरराव वझरकर या सेवानिवृत्त झाल्या होत्या. त्यांचे पती मधुकरराव वझरकर हे सुध्दा उपजिल्हाधिकारी या पदावरून सेवानिवृत्त झाले होते.आज सकाळी ७ वाजेच्यासुमारास सुशिलाबाई वझरकर ह्या



दैनंदिनीप्रमाणे कामकाज करत असतांना त्यांनी आपले पुत्र डॉ.सुनिल वझरकर यांना सांगितले की माझ्या पाठीत दु:खत आहे. सुनिल वझरकर यांनी आपण बसा मी दाबून देतो असे सांगितले आणि त्यांना खुर्चीवर बसवून डॉ.सुनिल त्यांच्या जवळ आले तेंव्हा त्यांची प्राणज्योत मावळली.

सुशिलाबाई मधुकरराव वझरकर (८८) यांनी आपल्या जीवंतपणीच आपला देहदान करण्याची इच्छा व्यक्त केलेली होती.त्यांच्या इच्छेनुसार डॉ.सुनिल वझरकर यांनी आपल्या आईचा देह वैद्यकीय महाविद्यालयाला दान दिला. सुशिलाबाई वझरकर यांचे अनिल,सुनिल आणि संतोष असे तीन पुत्र आहेत.तसेच मिरा आणि मिना अशा मुली आहेत. कोणालाही न बोलवता सकाळी ११वाजता वझरकर कुटूंबियांनी आपल्या आईचा देह वैद्यकीय महाविद्यालयास दिला.त्यांच्या पश्चात तीन मुले,सुना,नातु, पणतु,दोन मुली,जावई,नातु असा मोठा परिवार आहे. पारंपारिक पध्दतीला वगळून डॉ.सुनिल वझरकर यांनी आपल्या आईच्या इच्छेनुसार त्यांचा देह वैद्यकीय महाविद्यालयास दिला. सध्याच्या परिस्थितीत अवयव दान या चळवळीला सुध्दा मोठे यश येत आहे.

सुशिलाबाई वझरकर अत्यंत चालत्या-बोलत्या परिस्थितीत आपला जिवनप्रवास संपवून निघुन गेल्या आहेत.त्यांच्या शरिरातील काही अवयव इतरांना कामी येवू शकतील.तसेच वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यातून भरपूर काही शिकायला मिळेल. सर्वसामान्य जनतेत सुध्दा देहदान आणि अवयव दानाची पध्दत वाढली पाहिजे.



# पावसाच्या आगमनाचा खरा हर्षोल्हास बळीराजाला

## शेतकरी आंतर मशागतीच्या कामात व्यस्त

नायगाव /मृगनक्षत्र निघून चार दिवस झाले पण नायगाव तालुक्यामध्ये जोरदार झालाच नाही, यावर्षी तरी मृगनक्षत्रामध्ये पेरणी लागेल या आशेने शेतकरी कामाला लागला होता पण पाऊस वेळेवर पडत नसल्याने शेतकर्यांचे लक्ष आभाळाकडे लागलेले आहेत, आंतरमशागत करताना बरबडा येथिल शेतकरी माधव चोंडेकर

# शिंदेंना मिळणार तेवढ्याच जागा अजित पवार गटाला मिळणार का?-छगन भुजबळ

राष्ट्रवादीचा २५ वा वर्धापन दिन साजरा होत आहे. यावेळी छगन भुजबळ यांनी कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला.

राष्ट्रवादीचे दोन्ही गट आज २५ वा वर्धापन दिन साजरा करणार आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गट नगरमध्ये तर अजित पवार गटाने मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात वर्धापन दिन साजरा केला. राष्ट्रवादीच्या वर्धापन दिन सोहळ्यात छगन भुजबळांनी उमेदवारांना चिमटे काढले. लोकसभा प्रचाराला बोलावलं नाही. मला बोलावलं तर मतं कमी पडण्याची भीती अशी टोलेबाजी छगन भुजबळ यांनी केली.



शेवटपर्यंत जागा वाटचपाचा गुऱ्हाळ चालवून काही होणार नाही. शिंदे जेवढ्या जागा मिळणार तेवढ्या जागा आम्हाला पण मिळाल्या पाहिजेत. सगळ्यांना उमेदवारी द्या. उमेदवारी देताना सगळ्यांचा विचार करा. दलित आणि आदिवासी यांना राखीव जागा असतात. मुसलमान अल्पसंख्याक बंधू... याना पण संधी दिली पाहिजे. त्यांना पाठिंबा देऊन सहकार्य केले पाहिजे. मराठा समाज, दलित समाज आदिवासी समाज सर्व एकत्र आहेत. यामुळे सर्वांना एकत्र घेऊन काम केले पाहिजे.

मात्र, लोकांच्या डोक्यात घुसलं की ४०० पार आपला बेडा पार. आपण तसं करणार नाही पण लोकांचा समज तसा झाला. आता विधानसभा निवडणुका आहेत. संविधान बदलाचा काही प्रश्न नाही. त्यामुळं दलित, मुस्लिम, आदिवासी यांना पुन्हा आपल्याकडे आणायचं आहे. इंडिया आलायस दिशा भ्रम करण्यात यशस्वी झाले आहेत. जागा वाटपाचा निपटारा लवकर करायला पाहिजे. जागा वाटपाचं गुऱ्हाळ चालू ठेवल्याने आपल्याला फायदा नाही. शिंदे यांचे खासदार जास्त आले म्हणून त्यांना जास्त जागा असं करुन भांडणं नको... मी त्यांना सांगतो की, एकमेकासाह्य करु असे छगन भुजबळ म्हणाले. न पूछो मेरी मंजिल कहाँ है, अभी तो सफर का इरादा किया है। ना हारूंगा हौसला उम्र भर, ये मैंने किसी से नहीं खुद से वादा किया है... अशा प्रकारे शेरो शायरी करुन छगन भुजबळ यांनी कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला.

# दोन दीवसात सहा ट्रॅक्टर अवैध वाळू वाहतूक करताना पकडले

## उपविभागीय अधिकारी शैलैश लाहोटी यांनी पाच तर तहसिलदार हांदेश्वर यांनी एक ट्रॅक्टर पकडले

पाथरी ।प्रतिनिधी

पाथरी तालुक्यात मोठ्याप्रमाणावर गोदावरी पात्र असल्याने ठीकाणी रात्र-दीवस वाळु उपसा खुलेआम सुरु असुन मागिल दोन दीवसात महसुल प्रशासनाकडुन सहा ट्रॅक्टर पकडल्याची माहीती उपविभागीय अधिकारी शैलैश लाहोटी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दीली.पाथरी तालुक्यातील गोदावरी पात्रातुन मोठ्या प्रमाणावर वाळु उपसा सुरु असल्याने उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांना मिळालेल्या गुप्त माहीतीच्या अधारे मौजे.पाटोदा ग की येथे अवैध रेती उत्खनन चालू असल्याची माहती उपविभागीय अधिकारी पाथरी शैलेश लाहोटी यांना मिळताच तातकाळ पथक बोलावून पाटोदा ग.की येथे स्वतः पथकासह पोहोचले केली असता गोदावरी नदी पात्रात अवैध रेती उत्खनन करत असलेली दोन ट्रॅक्टर पकडून जप्त केली.




उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांच्या पथकातील तलाठी कर्मचारी आपासाहेब पाते व पोलीस कर्मचारी चन्द्रकांत शिंदे व एस.एस शिंदे ,पोलीस

पाटील राजेश ढवळे यांनी सदर जप्त केलेली दोन ट्रॅक्टर क्रमांक(उपलब्ध नाही) तहसील कार्यलय पाथरी येथे अटकावून ठेवले आहे वाहना मध्येय प्रतेकी १ ब्रास अवैध रेती आढळून आली असून दंडात्मक कार्यवाहीसाठी

पुढील कार्यवाही केली आहे. मागील दोन दीवसात उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी पाटोदा ग .की येथील अवैध गौण खिनज उत्खनन करणारे एकू ण ०५ वाहन जप्त करुनन दंडात्मक कार्यवाही साठी तहसिल कार्यालयात आणुन लावले असुन दी.१० जुन रोजी डाकुपिंप्रि सोनपेठ रोड वरुन तहसिलदार एस.एन.हान्देश्वर यांनी एक ट्रॅक्टर वाळू वाहतूक करताना पकडले असुन सदर ट्रॅक्टर पुढील कार्यवाही साठी तहसिल कार्यालयात लावले असल्याची माहीती उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दीली आहे.

रात्रभर चालु असलेले हायवा ट्रक व टीप्पर सोडुन ट्रॅक्टर वर महसुलाची कारवाई पाथरी तालुक्यातील रात्रीच्यावेळी सोनपेठ-पाथरी,गुंज-पाथरी,हादगाव-पाथरी रोडवर खुलेआम मोठं-मोठे हायवा,टीप्पर चालु असताना पाथरी महसुल प्रशासनातील अधिकारी व पोलीस प्रशासनाकडुन या वाहनांवर कारवाई न करता ट्रॅक्टर वर कारवाई चालू असल्याने पाथरी तालुक्यात उलट-सुलट चर्चेला




# प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या वतीने गटविकास अधिकारी यांना निवेदन

परळी ।प्रतिनिधी

थकीत पुरवणी देयके रक्कम संबंधित शिक्षकांच्या खात्यावर जमा करण्यासंदर्भात परळी वैजनाथ प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या वतीने आज गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.सदरील रक्कम मागील अडीच महिन्यापासून तालुकास्तरावर पडून आहे तीन ते चार वर्षापासून प्रलंबित देयके अदा होणे तसेच शिक्षण, आजार व इत्यादींसाठी आवश्यक आहे त्यानुसार रक्कम अदा करण्याची मागणी करण्यात आली. बीड जिल्ह्यात बीड,शिरूर कासार तालुक्याने सदरील रक्कम अदा केलेली आहे त्या धर्तीवर परळीत हा निर्णय घेऊन शिक्षक कर्मचारी यांना न्याय देण्यात यावा अशी विनंती यावेळी प्रहार शिक्षक संघटनेच्या वतीने करण्यात आली. यावेळी प्रहार शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष श्री कमलाकर कामाळे, जिल्हा समन्वयक श्री श्याम आघाव सर, जिल्हा प्रवक्ते श्री पद्माकर आंधळे सर तालुका उपाध्यक्ष श्री अरविंद चौधरी तालुका उपाध्यक्ष श्री नंदकिशोर जातकर सचिव किरण महाजन कार्याध्यक्ष श्री दीपक खंदारे कोषाध्यक्ष बाळासाहेब शिंदे अविनाश नेहरकर,जालिंदर नाईक,सचिन फड, गोरोबा कानवले, दिलीपराव बनसोडे, शिलादेवी मिश्रा,मीरा राऊत, भोसले सर मुंडेसर चौधरी सर आदी शिक्षक उपस्थित होते. यावेळी श्री गट विकास अधिकारी यांनी लवकरच न्याय देऊ व आपला प्रश्न मार्गी लावू असे अभिवचन दिले.



# महामार्गावरील रस्त्याला आले तलावाचे स्वरुप

## आ.पवारांच्या निर्देशनानूसार अधिकारी घटनास्थळी दाखल

१ कि.मी.सिमेंट रस्ता तयार करुन भुयारी नाली तयार करण्याचे अधिकार्यांनी दिले आश्वासन

गेवराई :- गढी ते माजलगांव या महामार्गावरील सिरसदेवी जवळ रस्त्यावर पाणी जमा होवू लागले. या ठिकाणी तलावाचे स्वरुप निर्माण झाल्याने वाहतूकीला अडथळा निर्माण होवू लागला. याची दखल आ.लक्ष्मण पवार यांनी घेवून याबाबत महामार्ग अधिकार्यांना निर्देश देत घटनास्थळी पाहणी करण्यासाठी पाठवले. अधिकार्यांनी ज्याठिकाणी पाणी जमा होते त्याठिकाणी १ कि.मी.सिमेंट रस्ता व भूयारी नाली करण्याचे आश्वासन दिले आहे.

गेल्या काही महिन्यापूर्वी विशाखापटनम महामार्गाचे काम झाले. हा महामार्ग गढी ते माजलगांव या दरम्यान जात आहे. महामार्गावरील सिरसदेवी फाट्याजवळ पाणी जमा होवू लागले. दोन दिवसापासून पाऊस पडत असल्यामुळे सदरील ठिकाणी तलावाचे स्वरुप आले. रस्त्यावर पाणी जमा होत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होवू लागला. याची दखल घेवून आ.लक्ष्मण पवार यांनी महामार्ग अधिकार्यांना निर्देश दिले. त्यानूसार आज अभियंता कादरी, खंदारे यांनी घटनास्थळी जावून रस्त्याची पाहणी केली. ज्याठिकाणी पाणी जमा होते. तेथे एक कि.मी. सिमेंट रस्ता व भुयारी नाली करण्याचे आश्वासन देण्यात आले.




# मुंबई कोस्टल रोडचा दुसरा बोगदा आजपासून सेवेत!

मुंबई : कोस्टल रोड हा महाराष्ट्रातील विकासकामांपैकी एक महत्त्वाकांक्षी असा प्रकल्प आहे. या रोडमुळे मुंबईच्या वाहतूक कोंडीपासून मुंबईकरांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळणार आहे. त्यासाठी मुंबई कोस्टल रोडच्या दुसऱ्या टप्प्याचे उद्घाटन आज होणार आहे. त्यानंतर मरीन ड्राइव्ह ते वरळी दुसरा बोगदा आजपासून वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. त्यामुळे हे अंतर फक्त ९ मिनिटांत पार करता येणार आहे. दरम्यान, आज भूमिगत मार्ग नागरिकांना प्रवासासाठी खुला केला जाणार आहे.

मरीन ड्राइव्ह ते वरळी ही मार्गिका सोमवार ते शुक्रवार असे पाच दिवस सकाळी ७ ते रात्री ११ वाजेपर्यंत अशी १६ तास खुली ठेवली जाणार आहे. कोस्टल रोड प्रकल्पाचे आतापर्यंत ९० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामं पूर्ण करण्यासाठी शनिवार आणि रविवारी ही मार्गिका बंद ठेवली जाणार आहे.

वरळी ते मरीन ड्राइव्ह दरम्यानच्या महत्त्वाकांक्षी कोस्टल रोड प्रकल्पाचा दक्षिणेकडील कॅरेजवे १२ मार्च रोजी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. तथापि, ३१ मे रोजी होणाऱ्या रस्त्याच्या दुसऱ्या टप्प्याचे उद्घाटन होण्यास उशीर झाल्यामुळे विरोधी पक्षांनी टीका केली. यानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १० जून रोजी उत्तरेकडील कॅरेजवे उघडण्याची घोषणा केली.

महापालिका आयुक्त भूषण गगराणी म्हणाले, दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ सोमवारी होणार असून मंगळवारी सकाळी ७ ते रात्री ११ वाजेपर्यंत रस्ता वाहतुकीसाठी खुला असेल. सध्या हा रस्ता १६ तास खुला राहील, कारण कोस्टल रोडला बीडब्ल्यूएसएलशी जोडण्याचे काम अद्याप सुरू आहे, अशी माहिती आहे. कोस्टल रोड आणि वांद्रे-वरळी सी लिंक ऑक्टोबर २०२४ पर्यंत पूर्ण होईल.

# स्वर्गीय.उमेश (दंडम आण्णा) जाधव यांचा वाढदिवस आदर्श उपक्रमातून साजरा

नाळवंडी । प्रतिनिधी

स्वर्गीय. उमेश चंद्रकांत जाधव (दंडम आण्णा) यांच्या जयंती निम्मित आज दंडम आण्णा मित्र मंडळाचा वतीने हाती घेतलेला निर्णय आतिषय प्रेरणा दायी ठरणारा आहे,,,आज दंडम आण्णा जरी आपल्या मधून निघून गेले असले तरी त्यांचे राहिलेले अधुरे सामजिक कार्य आज एक मुलगा म्हणून रितेश जाधव हा करतोय,गोर गरीब जनतेची मदत करणे,आपल्या हातून जेवढे चांगले काम करता येतील तेवढे चांगले काम करणे ही एक बाप म्हणून दंडम आण्णा ची शिकवण रितेश ला बरच काही सांगून जाते,आज खऱ्या अर्थाने बापाला एक मुलगा म्हणून शोभलास रितेश,तू आणि तुझ्या मित्र परीवाच्या वतीने घेतलेला उपक्रम प्रेरणादायी असेल.

आज बीड तालुक्यातील ढेकनमोह या ठिकाणी असलेले वंचितांच्या हक्काच घर ज्याला म्हणता येईल असे पसायदान सेवा प्रकल्प या ठिकाणी दडंम आण्णा मित्र मंडळाच्या वतीने स्वर्गीय उमेश चंद्रकांत जाधव (दंडम आण्णा)यांच्या वाढदिवस तथा जयंती निम्मित आज अनाथ विद्यार्थ्यांना संपूर्ण लागणारे शैक्षणिक साहित्य तसेच, दैनंदिन जीवनात लागणारे साहित्य त्याचबरोबर अनेक प्रकारचे फळे या अनाथ मुलांना वाटप करण्यात आले, आज खऱ्या अर्थाने वाढदिवस साजरा झाला म्हणता येईल,आणि असे अनाथ विद्यार्थ्यांना मदत करणे ही खरी श्रद्धांजली असेल.या घेतलेल्या कार्यक्रमाच्या वेळी रितेश जाधव आणि त्याचे बरेच सहकारी उपस्थित दिसत आहेत.




# सहा वर्षापासून अनुकंप तत्वावर नोकरीस घेत नाहीत सुनिता गित्ते व कुटुंबाचे दुसऱ्या दिवशी आमरण उपोषण सुरू

## उपोषणकर्त्या सुनिता गित्ते यांना गंभीर आजार तरी देखील समाज कल्याण प्रशासनाचे दुर्लक्ष

**बीड ।प्रतिनिधी**

**साने गुरुजी निवासी विद्यालय केज ता. जिल्हा बीड येथे कै. गोविंद ज्ञानोबा गीते ते सहशिक्षक पदावर कार्यरत होते, त्यांच्या निधनानंतर अनुकंपातत्वावर त्यांचा मुलगा श्रीनाथ गोविंद गीते यास नियमानुसार नोकरी मिळावी म्हणून सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन व वारंवार 'पाठपुरावा करुनही आजतागायत नौकरी मिळत नसल्याने व मोठ्या आजाराने मुळे गित्ते कुंटूबावर उपासमारीची वेळ आली आहे. सुनिता गोविंद गीते व कुंटूबावर होत. होत असलेला अन्याय दुर व्हावा म्हणून वारंवार समाज कल्याण कार्यालयास व वरिष्ट कार्यालयास पत्र व्यवहार केला आहे. परंतु पत्रव्यवहाराची कोणतीही दखल न घेता सतत प्रस्तावात त्रुटी काढून नौकरी दिली जात नाही. मात्र इतरांच्या नियुक्त त्यांनी पैसे घेऊन केले आहे. व गीते कुटुंबीयांची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे. त्यामुळे मी दिनांक २७/०५/२०२४ रोजी उपोषण करण्याची नोटीस दिली होती. तरी अद्यापपर्यंत बीड अनुकंप तत्वावरील नौकरीची ऑर्डर दिली नाही.**




त्यामुळे नाईलाजास्तव होत असलेल्या अन्याया विरुध्द दिनांक १०/०६/२०२४ रोजी पासुन समाज कल्याण कार्यालयासमोर सहकुंटूंब आमरण उपोषणास बसले आहे. गीते कुटुंबीय उपोषणा करण्यापासून बीड समाज कल्याण विभागातील अधिकारी कर्मचारी दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून नियमबाह्य भरलेल्या जागेची तपासणी करण्यात यावी यामध्ये मोठा आर्थिक व्यवहार झाल्याचेही उपोषणकर्त्यांचा आरोप आहे.

उपोषणाचा आज दुसरा दिवस आहे व अद्यापही समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी या उपोषणकर्त्यांची दखल घेतली नाही. उपोषणकर्ते या गंभीर आजारात असल्यामुळे त्यांच्या जीवाचं काय बर वाईट झालं तर याची परिणाम समाज कल्याण विभागातील अधिकाऱ्यांना भोगावे लागतील कुपोषणाचा आज दुसरा दिवस सुरू आहे.

# सावरगाव येथील पाझर तलावातील अनधिकृत विहिरीचे पाणी उपसा बंद करावा नसता आंदोलन

## घनश्याम मस्के यांची मागणी

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सावरगाव येथील सर्वे नंबर ३६ /४४ च्या उत्तरेस असलेल्या तलावातील विहिरी पाईपलाईन इंजिन हे सर्व महाराष्ट्र शासनाच्या हद्दीत आहेत ते त्वरित बंद करावेत नसता लोकशाही मार्गाने आंदोलन केलेले असा इशारा माजी सैनिक घनश्याम मस्के यांनी दिला आहे सविस्तर वृत्त अशी की सावरगाव येथील पाझर तलावातील एकूण आठ विहिरी आहेत व पाच इंजिन आहेत त्यातून २४ तास पाणी उपसा सुरू आहे व ग्रामपंचायत विहीर पाईपलाईन चा खाजगी शेतीसाठी वापर केला जात आहे तलावाच्या दक्षिणेस आहे त्या नदीकाठच्या सोमवारी ४०० ते ५०० शेतकरी आहेत त्या शेतकऱ्यांकडे डीसीसी बँक भारतीय भारतीय स्टेट बँक यांची पीक कर्ज आहे गैर कानूनी पाणी उपसा झाल्यास सर्व शेतकरी नापीक होणार आहेत व कर्ज भरू शकत नाहीत त्यापैकी कोणी शेतकऱ्यांनी आत्महत्या झाल्यास संबंधित प्रशासन जबाबदार राहील व संबंधित तलावातील सर्व महाराष्ट्र शासन हद्दीतील विहिरी बंद कराव्यात असे आशयाची निवेदन दिनांक ७/ ११/ २०२२ रोजी जलसंधारण विभाग आष्टी तहसीलदार आष्टी असतील जिल्हाधिकारी कार्यालय बीड व महसूल मंत्रालय यांना देण्यात आले आहे यांना निवेदन देऊनही कसलीच कारवाई करण्यात आली नाही जर कारवाई झाली नाही तर अमरण उपोषणाचा इशाराही त्यांनी दिला आहे या निवेदनावर अण्णा मस्के श्रीमंत शिवराम मस्के अंकुश मस्के दगडू मस्के यांनी स्वतः सह्या करून ही निवेदन संबंधित विभागाला दिले आहे तरी त्वरित दखल घ्यावी अशी मागणी घनश्याम मस्के यांनी केली आहे



# सण,उत्सव,सार्वजनिक जयंती,यात्रोत्सव निर्विघ्न पार!

## पोलिस अधीक्षकांकडून ठाणेदारांचे कौतुक

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी पोलिस ठाणे हद्दीत काही महिन्यापुर्वी पदभार घेऊन आपल्या कामाची व नियोजनाची चुणूक दाखवून अनुभवी व्यक्तीची हातोटी वापरत सण,उत्सव, सार्वजनिक जयंती,यात्रोत्सव शांततेत पार पडल्याने कर्तव्य बजावणाऱ्या खाकीवर नागरिक समाधानी झाल्याचे दिसुन येत आहे.

आष्टी पोलिस ठाण्याचा काही महिन्यापुर्वि पदभार घेतलेले पोलिस निरीक्षक संतोष खेतमाळस यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी शांतता समितीच्या बैठका घेऊन गावपुढारी याच्याशी संपर्क ठेवत रमजान ईद, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती,परशुराम जयंती,राम नवमी, महावीर जयंती, छत्रपती संभाजी महाराज जयंती, हद्दीतील सर्वात मोठा कडा येथील यात्रोत्सव, हे सण,उत्सव, जयंती,यात्रोत्सव कसलेही गालबोट न लागता सार्वजनिक शांतता भंग न होता खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली आहे.यासाठी तगडा बंदोबस्त देत जनतेच्या मनात पोलिसाविषयी चांगली भुमिका निर्माण केली आहे.भविष्यात देखील सार्वजनिक कार्यक्रम एकोप्याने आणि गुण्या गोंविदाने पार पडावेत यासाठी ठाण्यातील अधिकारी,कर्मचारी प्रयत्न असणार असल्याचे पोलिस निरीक्षक संतोष खेतमाळस यांनी सांगितले.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने ठाणे हद्दीत मतदान बंदोबस्त व झोन पेट्रोलिंग बंदोबस्ताचे योग्यरित्या नियोजन करून सतर्क राहून कोणताही अनुचित प्रकार घडू न देता मतदान बंदोबस्त पार पाडल्याने व दैनंदिन कामाचे कौतुक करत पोलिस अधीक्षक यांनी पोलिस निरीक्षक संतोष खेतमाळस यांना प्रशस्तीपत्रक देऊन कौतुक केले.

# वाघीरा गावामध्ये जलजीवन योजना व गावातील दोन मोठ्या बंधाऱ्यांच्या कामांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार - गोकुळ बांगर

लिंबागणेश/पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा तालुक्यातील वाघीरा या गावामध्ये जल जीवन योजना व वाघिरा मेंगडेवाडी मधील दोन खूप मोठे बंधारे यामध्ये खूप सारा भ्रष्टाचार झालेला आहे सत्तेचा दुरुपयोग करून काही लोक खूप मोठा भ्रष्टाचार करून स्वतःचे घर भरण्यासाठीचा प्रयत्न करत आहेत. यामध्ये शासनाच्या पैशाची नासाडी होत आहे व गावातील विकास रखडत आहे.

अंदाजित ४ कोटी रुपयांची ही सर्व कामे आहेत त्याचा वापर हा गैरमार्गाने होत असल्याचे वाघिरा येथील सामाजिक कार्यकर्ते गोकुळ बांगर यांनी आरोप केला आहे व या सर्व कामांची शासनस्थरावरून चौकशी होऊन कारवाहीची मागणी ते करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी जर आवाज उठवण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर राजकीय दबाव आणला जात असल्याचे देखील प्रकार समोर येत असल्याचे गोकुळ बांगर यांनी यावेळी सांगितले आहे परंतु या प्रकरणाचा संपूर्ण तपास लागल्याशिवाय मी माघार घेणार नसल्याचे देखील त्यांनी सांगितले. पाटोदा तालुक्यातील जनतेला फसवून जर अश्या प्रकारे भ्रष्ट कामे होत राहिली तर तालुक्यातील गावे विकासाला मुकतील व पुढील १५ वर्ष पुन्हा निधीचा वाटा देखील या गावांना मिळणार नाही त्यामुळे आताच अश्या भ्रष्ट आणि निकृष्ट लोकांना आवरले पाहिजे असे सामाजिक कार्यकर्ते गोकुळ बांगर यांनी स्पष्ट केले आहे.



# प्रभाग क्र. २४ मध्ये खराब रस्ते, तुंबलेल्या नाल्याची साफसफाई, दुरुस्ती करा -शुभम जोगदंड

## न.प.मुख्याधिकारी निता अंधारे यांना निवेदन



बीड ।प्रतिनिधी

प्रभाग क्रमांक २४ मधील लोकांच्या समस्या पाहता रस्ते खराब व नाल्यातून दिला आहे त्यामुळे रहदारी करताना प्रभागातील लोकांना अडचण होत आहे काही लोकांची अपघात ही घडलेले पहावयास मिळत आहे. काही लोकांचे अपघातही या रस्त्यावर झालेले आहेत. या संदर्भात बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे निवेदन देऊन कामा तात्काळ करावे व दुरुस्ती करावी अशी मागणी करण्यात आली आहे. कामाचा आढावा घेण्यात आला यावेळी राष्ट्रवादी विध्यार्थी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस शुभम जोगदंड, जिल्हा सचिव अमित डोंगरे,जिल्हा सरचिटणीस अलंकार सरवदे व आदी उपस्थित होते.



**बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांची सदिच्छा भेट घेऊन ऐतिहासिक विजयाच्या शुभेच्छा दिल्या**



# ऊंडणगाव येथे बालाजी उत्सवास येणा-या पाहुण्यांचे गटाराच्या उघड्या नाल्यांनी होणार स्वागत

**संभाजीनगर ।प्रतिनिधी**

**बालाजी उत्सव ऊंडणगाव मधे अतिउत्साह पुर्ण वातावरणात गेली दहा दिवस साजरा करण्यात आला .तसेच या उत्सवाची आज दि.११जुन २०२४रोजी लळीताच्या कार्यक्रमाने सांगता होत आहे .या लळीताच्या कार्यक्रम सुरु असताना गावात सगळ्या नागरिकांच्या घरात पाहुणे मंडळींची रेलचेल असणार हे दरवर्षी ठरलेलेच.**

मात्र इतर शहरातुन ऊंडणगाव येथे लळीत कार्यक्रम प्रसंगी उपस्थित असणार्या पाहुण्यांना ऊंडणगाव ग्रामपंचायत ही उघड्या नाल्यांचे दर्शन देण्यासाठी महत्त्वाची ग्रामपंचायत ठरणार याचे जरासेही भान ग्रामपंचायत ला नाही.ऊंडणगावात ग्रामपंचायत ने अगोदरच रस्त्याचे काम करण्यात दूजाभाव केलेला आहे. गावात अनेक गल्यांमधे वार्डा वार्डातील कामात चकाचक रस्ते ,पाणी वाहून जाणाऱ्या नाल्या तयार करण्यात आल्या आहेत . मात्र अनेक वेळा बर्याच चॅनल व लोकदिशा वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध करून ही या ग्रामपंचायत ला जाग येईना ऊंडणगाव येथील कसाई गल्ली तसेच टिपु सुलतान चौक येथील घाण मलमुत्र च्या नाल्या या नागरिकांच्या घरासमोरून नेहमी वाहत आहेत.मात्र हे सर्व बघूनही डोळेझाक करत आहे हा निर्लज्ज पणाचा कळस ग्रामपंचायत ने गाठला असुन मागील काही दिवसांपूर्वी जिल्हाधिकारी यांनी पावसाचे साडपाणी यांचे नियोजन करण्याचे आदेश दिले असतानाही खुद्द जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला देखील ऊंडणगाव ग्रामपंचायत जुमानत नसल्याचे येथे दिसते.

तसेच या नाल्यातुन अत्यंत घाण असा दुर्गंध नेहमी येत असतो त्याच्या आजूबाजूला लहान लहान बालके खेळत असतात तसेच दररोज या घाण मलमुत्र घ्या पाण्यातुन डासांची उत्पत्ती वाढल्याने सर्वत्र डासांचा उपद्रव वाढला असुन या डासांमुळे लहान बालके आजारी पडल्याचे प्रमाण देखील वाढले आहे या डासांमुळे ताप तसेच डेंग्यू पसरण्याची भिती आहे .याविषयी माजी उपसरपंच पंकज जैस्वाल यांना या नाल्यावर ढापे बसविण्यात यावे असे गेल्या दोन ते तिन वर्षांपासून कळवले असता त्यांनी केवळ वेळ मारुन नेण्यात मोठेपणा दाखवण्यात अग्रेसर राहीले .

# ३४ वर्षांनी झाल्या गाठीभेटी खर्डा इंग्लिश स्कूल शाळेतील इयत्ता दहावीच्या १९९० च्या बॅचचा स्नेह मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न

जामखेड ।प्रतिनिधी

खर्डा इंग्लिश स्कूल खर्डा या शाळेतील इयत्ता दहावीच्या १९९० च्या बॅचचा स्नेह मेळावा (गेट टुगेदर) सोहळा काल रविवार दि. ९ जून २०२४ रोजी अतिशय उत्साहात संपन्न झाला. बहुतेक ५० वर्षांपेक्षा जास्त वयाचे वर्ग मित्र, मैत्रिणी ३४ वर्षांनंतर जेव्हा प्रथमच भेटले तेव्हा एकमेकांना ओळखता आले नाहीत. व्हाट्सऍपच्या माध्यमातून संपर्क झाल्या मुळे सर्वांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला. या बॅचला अध्यापन करणारे शिक्षक गहिनीनाथ काकडे, अशोक भांडवले, रामचंद्र गुरसाळी, गेनबा शिंदे, गोरखनाथ राजगुरू, घनवट सर यांची उपस्थिती लाभली. उपस्थित सर्व माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी यांनी या शिक्षकांना फेटे बांधून व पुष्पवृष्टी करत कार्यक्रम स्थळी आणले. यावेळी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. जेष्ठ शिक्षक गहिनीनाथ काकडे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले तर प्रमुख उपस्थिती मध्ये,अशोक भांडवल, गोरखनाथ राजगुरू, रामचंद्र गुरसाळी, गेनबा शिंदे, घनवट, माजी विद्यार्थी दादासाहेब गिते (उपजिल्हाधिकारी पुणे), वैजीनाथ पाटील (संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती जामखेड), पोलिस निरीक्षक विक्रम गौड, पोलीस उपनिरीक्षक रामा पवडमल, साहित्यिक गोकुळ गायकवाड, हे उपस्थित होते.

सर्व शिक्षकांना मानाचा फेटा बांधून सन्मानचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ आणि माजी विद्यार्थी गोकुळ गायकवाड लिखित धम्मपदा बोलती दोहे आणि गाथा हा ग्रंथ भेट देऊन सन्मान करण्यात आला. तर सर्व माजी विद्यार्थी विद्यार्थिनी यांना शाळेचे नाव असलेला सुंदर पेन भेट देण्यात आला. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी मुंबई, पुणे, ठाणे, नासिक, पोलादपूर अशा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून माजी विद्यार्थी उपस्थित झाले होते.



आपले मनोगत व परिचय करून देताना अनेकांच्या भावना अनावर झाल्या. संपूर्ण दिवस गप्पागोष्टी करत एकमेकांच्या सुखदुःखाची विचारपुस केली. सर्वजनावर कुटुंबाची जबाबदारी असताना आज आपल्या मित्र मैत्रिणीसाठी एक दिवस राखून ठेवला होता. मुलींची उपस्थिती उल्लेखनीय होती. त्या प्रचंड आनंद लुटताना दिसून आले. यापुढे सतत एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी झाले पाहिजे असे सर्वानुमते ठरले. प्रत्येक वर्षी अशा स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्याचेही ठरविण्यात आले.

शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही , शिक्षण हा प्रगतीचा राजमार्ग आहे. शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते बोलत होते. तसेच त्यांनी विपश्यना करण्याचा सर्वांना आग्रह केला.

# एकनाथ शिंदे यांना आदर्श सरपंच पुरस्कार प्रदान

वापेगाव ।प्रतिनिधी

ग्रामपंचायतचे सरपंच एकनाथ अगतराव शिंदे यांना नुकताच अमेरिकेचे खगोल शास्त्रज्ञ ठक्कर (ठाणेवाला), खंडू गायकवाड (उपसरपंच), सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेते अनिकेत केळकर (चित्रपट अभिनेते), अरुणराव शिंदे (ग्रामपंचायत सदस्य वापेगाव), भीमराव करचे (पत्रकार), हनुमंतराव आटपाडकर (महाराज) यांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत आदर्श सरपंच पुरस्कार प्रदान करण्यात आला. याबद्दल समस्त वापेगावात त्यांचे अभिनंदन होत असून यापुढेही त्यांच्या हातून अशाच प्रकारे चांगली जनसेवा व्हावी अशा सदिच्छा व्यक्त केल्या जात आहेत. यावेळी उपसरपंच खंडू भागवतराव गायकवाड यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार वितरण सोहळा जनादेश टीव्ही न्यूज चैनल कडून आयोजित करण्यात आला होता. सरपंच एकनाथ शिंदे यांना आदर्श सरपंच पुरस्कार देताना त्यांनी ग्रामपंचायत सदस्य पासून ते सरपंच पदापर्यंत केलेल्या विविध लोकोपयोगी, समाजोपयोगी कार्याची दखल घेण्यात आली. शिंदे यांनी आतापर्यंत गरजू गावकऱ्यांना आवास योजनेअंतर्गत घरकुल मिळवून दिले.

गावात पिण्याच्या पाण्याची समस्या होती, ती दूर व्हावी पाण्याचा प्रश्न सोडविण्यात यावा याकरिता पाठपुरावा करून गावात पाणीपुरवठा योजना सुरळीत सुरू केली. आता गावात नळांना दररोज पाणीपुरवठा करण्यात येतो. याशिवाय पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळावं म्हणून गावकऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने आरओ वॉटर फिल्टर ग्रामपंचायत मार्फत चालू करून सर्वांना पिण्याचे शुद्ध पाणी देण्याचे कार्य केले. मुख्य रस्त्यापासून गावाला येणारा रस्ता सिमेंट काँक्रीटचा तयार करून घेतला. यामुळे मुख्य रस्त्यावरून गावाचा आणि दळणवळणाचा प्रश्न सुटला. गावातील गरजूवंत रुग्णांच्या शस्त्रक्रियांसाठी सरकारी योजनेतून शस्त्रक्रिया करून घेतल्या. गावात साजरे होणारे यात्रा व महोत्सव कमी खर्चात पार पाडावे, यासाठी विशेष प्रयत्न केला. सामाजिक सलोखा वृद्धिंगत व्हावा, ग्रामस्थांची भावनिक नाळ तुटू नये, यासाठी जात-पात न मानता सर्व महापुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथी साजरे करण्यात नेहमी पुढाकार. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसानची भरपाई शासनाकडून लवकर मिळावी म्हणून केवायसी साठी आवश्यक कागदपत्रे व इतर बाबींची पूर्तता वैयक्तिक भेटीगाठी घेऊन केली. डिजिटल साधनांचा वापर करून ग्रामस्थांकडून आलेल्या तक्रार निवारणासाठी मोबाईलवर व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून नागरिकांच्या कोणत्याही प्रकारच्या समस्या सोडवण्याचे काम करत आहेत. गावातील शाळा व अंगणवाडी येथे सतत भेट देऊन शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी सर्वतोपरी कार्य करत आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर गावातील विद्यार्थ्यांना बाहेरगावी जाऊन महाविद्यालयीन शिक्षण घेण्याची वेळ येऊ नये. त्यांना प्राथमिक सारखेच माध्यमिक शिक्षण सुद्धा गावातच मिळावे. याकरिता माध्यमिक विद्यालय गावात स्थापन करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. गावात वीज सातत्याने मिळेल यासाठी सुद्धा २४ तास दक्ष राहून कार्य करत आहेत. सरपंच



एकनाथ शिंदे करत असलेले हे सर्व कार्य पाहून जनादेश टीव्ही न्यूज चैनल चे पत्रकार आबासाहेब शिंदे व भीमराव करचे यांनी संपादक मंगेश प्रभुळकर आणि आशु भालेराव यांच्याकडे त्यांना आदर्श सरपंच पुरस्कार देण्याचे सुचित केले होते. यानुसार त्यांना आदर्श सरपंच हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी दामोदर कृष्णाजी सोमन आणि आरती राठोड, माजी सरपंच दत्तू हेंबाडे, माजी सरपंच अरुण शिंदे, वापेगाव तंटामुक्ती अध्यक्ष विठ्ठल गायकवाड, कुंडलिक गायकवाड, सर्जेराव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.



# वृक्षारोपण व ग्रंथ वाटून वाढदिवस साजरा

बीड ।प्रतिनिधी

डाक विभागाचे असिस्टंट पोस्ट मास्तर अमरसिंग ढाका व जि. प.माध्यमीक चे उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे यांचा संयुक्त जन्मदिवस ९ जुन रोजी रविवार होता व पोस्ट ऑफिस व जि.प. शिक्षण विभागात राजेश खटावकर अधीक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी व अजय बहीर अधीक्षक शिक्षण विभाग यांच्या हस्ते वृक्षारोपण व बाबासाहेब आंबेडकर लिखित जाती संस्थेचे उच्चाटन निहिलेशन ऑफ कास्ट व देवळाचा धर्म आणि धर्मातली देवळे प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे लिखीत हे दोन ग्रंथ वाटून साजरा करण्यात आला. त्यावेळी सोबत सामाजिक कार्यकर्ते मुसाखान, मिलिया स्कूल से प्राचार्य इरफ़ान सिद्दीकी व डाक विभागाचे पोस्ट मास्तर हेमंत वानखेडे,उप पोस्ट मास्तर विष्णू वीर अकाउंटंट बाबुराव धनवडे, अरूण पतंगे,बाबासाहेब जाधव, दत्तात्रेय गाडेकर, बाबासाहेब मोरे, किरण सावंत, अब्दुल जुनेद, तांबडे,उमेश शिंदे, उमेश बागलाणे, महादेव रसाळ,मनोहर भालशंकर इत्यादी कर्मचारी हजर होते.

# २५ जून पर्यंत प्रचलित नियमानुसार पुढील टप्पा निधीसह देण्याची घोषणा करा

## अन्यथा २७ जून पासून आझाद मैदानावर आंदोलनाचा कृती समितीचा इशारा

बीड ।प्रतिनिधी

राज्यातील अंशतः अनुदानित शाळेंना प्रचलित नियमानुसार टप्पा वाढ अनुदान द्यावे या संदर्भामध्ये २५ जून पूर्वी निधीसह अनुदान वितरित करण्याची घोषणा करावी अन्यथा २७ जून पासून मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य कायम विनाअनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष श्री. खंडेराव जगदाळे यांनी दिला असल्याची माहिती कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर यांनी दिली ऑक्टोबर २०२३ मध्ये मुंबई आझाद मैदानावर विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षक आणि शिक्षका तर कर्मचाऱ्यांनी पुढील टप्पा वाढीसाठी मोठे आंदोलन केले होते. यावेळी राज्याचे शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी ०१ जानेवारी २०२४ पासून टप्पा वाढ देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु अद्यापही या शासनाचे पूर्तता झाली नाही त्यामुळे टप्पा वाढ अनुदान मिळाले नाही. दरम्यान लोकसभा निवडणूक आचारसंहिता असल्याने अनुदान टप्पावाढी प्रक्रिया थांबली. ४ जून पासून लोकसभा निवडणूक प्रक्रिया पूर्ण होऊन आचारसंहिता संपुष्टात आली आहे. आत्ता केंद्रामध्ये तिसऱ्यांदा मोदी सरकार सत्तेत येत आहे. याच पार्श्वभूमीवर लवकरात लवकर राज्य शासनाने टप्पा वाढ जाहीर करावी या साठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कायम विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांची काल ९ जून रोजी ऑनलाईन बैठक घेण्यात आली. या बैठकीत राज्य शासनाने २५ जून पर्यंत प्रचलित नियमानुसार पुढील टप्पा निधीसह देण्याची घोषणा करावी या प्रमुख मागण्यासह ६ फेब्रुवारी २०२३ नुसार ३० डिसेंबर २०२३ पर्यंत २०/४०/६० टक्के अनुदानास पात्र असलेल्या अनुदानावरील खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, वर्ग तुकडया यांना दिनांक ०१ जानेवारी २०२४ पासून वाढीव २०% वेतन अनुदान मंजूर करुन प्रचलित धोरणानुसार अनुदान द्यावे, १५ नोव्हेंबर २०११ व ०४ जून २०१४ च्या शासन निर्णयाचे वेतन अनुदान सुत्र शाळांना लागु करून यापुढील प्रतिवर्षी ०१ जानेवारी पासूनच पुढील टप्पा देण्यात यावा, शासन निर्णय दि १२, १५ व २४ फेब्रुवारी २०२१ नुसार ३० दिवसात त्रुटीची पूर्तता केलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा ज्या वेतन अनुदानाच्या एका टप्याने मागे राहिल्या आहेत. अशा शाळांना मागील थकीत टप्पा अनुदान देवून ०१ जानेवारी २०२४ पासून समान वेतन अनुदानाच्या टप्प्यावर आणावे या मागण्यांच्या अनुषंगाने चालु पावसाळी अधिवेशनात निधीसह तरतूद करावी, अन्यथा येत्या २७ जून २०२४ पासून आझाद मैदानावर राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशारा कायम विनाअनुदानित शाळा कृती समितीचे महाराष्ट्र अध्यक्ष तात्यासाहेब म्हसकर आणि राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे, यांनी दिला असल्याची माहिती कायम विनाअनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांनी दिली.




श्रीमती क्रांती खेडकर यांची यवतमाळ

# जिल्हा परिषद येथे शिक्षण विस्तार अधिकारी पदी निवड

वडवणी ।प्रतिनिधी

**परिस्थितीशी दोन हात करून नियतीला झुकवण्याचा संघर्ष करून यश मिळवणारे खरे विजेते असतात. सोन्याचा चमचा तोंडात घेऊन आलेल्यांचे गोडवे गाण्यात अर्थ नसतो व्यक्ती शून्यातून विश्व निर्माण करून शकते. परिस्थिती अनुकूल असताना यशाचे टप्पे गाठणे तसे सोपे काम परंतु नेमकी त्याच्या उलट प्रतिकूल परिस्थितीतून एखादा टप्पा हा इतरांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरक ठरू शकतो. वडवणी येथील रहिवाशी आदर्श शिक्षिका श्रीमती खेडकर क्रांती महादेवराव ( घुगे) यांची यवतमाळ जिल्हा परिषद येथे शिक्षण विस्तार अधिकारी पदावर निवड झाली आहे. त्यांच्या निवडी बद्दल जिल्हा भरातुन शुभेच्छा वर्षाव होत आहे.क्रांती खेडकर यांच्याकडे अभ्यासू शिक्षिका म्हणून पाहिलं जातं अंगी जिद्द आणि चिकाटी अतिशय लहान वयापासून होती. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी मेहनत करणे हा त्यांचा जीवनाचा पाया राहिला आहे.. आज सुद्धा तेवढीच मेहनत करण्याची तयारी आहे.. आणि हीच मेहनत आज यशाच्या उच्च शिखरावर येऊन ठेपली आहे.वडवणी येथील सरकारखोरी तांडा येथे नौकरी आसल्याने त्या पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना बंजारा भाषेत शिकवत असे दहा वर्षे पहिली ते चौथी च्या विद्यार्थ्यांना शिक्षण नंतर काही वर्षांनी त्यांची बीड तालुक्यातील मैंदा येथे बदली झाली नंतर दोन वर्षांनी त्यांनी यवतमाळ येथे सरळसेवा भरती २०२३..शिक्षण विस्तार अधिकारी पदाची परीक्षा दिली परीक्षा दिल्यानंतर काही महिन्यानंतर निवडणूक आयोगाने निवडणूक जाहीर केल्यानंतर तारीख निकाल लांबला आणि दिनांक ०७/०६/२०२४ रोजी रात्री निकाल लागला.निकाल लागताच सर्वच स्तरातून क्रांती खेडकर मॅडम यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत.**



आज मी मॅडम मुळेच पत्रकार - संभाजी लांडे

अभ्यासू शिक्षिका म्हणून क्रांती खेडकर मॅडम यांच्याकडे पाहिल जात. तर दुसरीकडे मी पहीली ते चौथी मी मॅडमच्या हाताखाली शिकलो. शाळा सोडल्यानंतर ही माझ्याकडून त्या मुला प्रमाणे अभ्यास करून घ्यायच्या. लिखाण, पाठांतर, लिखाण मुद्दे, बोलणे, पाठांतर, राजकीय, सामाजिक, भेदभाव, समाजभाव हा अभ्यास केल्यानंतर मला बीड येथे पत्रकारिता साठी डिग्री ही प्राप्त करून दिली. माझ पत्रकार होण्याचं श्रेय क्रांती खेडकर मॅडम यांचच आहे.

गुमनामी के अंधेरे में था,
पहचान बना दिया।
दुनिया के गम से मुझे,
अनजान बना दिया।
उनकी ऐसी कृपा हुई,
गुरू ने मुझे एक अच्छा इंसान बना दिया।

# अखेर लिंबागणेश येथील मुळेवस्ती रस्ते कामास सुरूवात

## .... तब्बल ७५ वर्षानंतर रस्त्याचा प्रश्न सुटला :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश :- स्वातंत्र्यानंतर ग्रामीण भागात दळणवळणाची साधने व्हावीत यासाठी मनरेगा तसेच मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत कोट्यवधींचा निधी शासनाकडून गावपातळीवर खर्च करण्यात आला.मात्र काही वस्ती यापासून वंचित असल्याने ग्रामस्थांना लोकसहभागातून रस्ते करण्याची वेळ आली आहे.अखेर यावर्षी मुलांच्या शालेय शिक्षण, दवाखाना, बाजारहाट तसेच खत बियाणे, भाजीपाला यांची पावसाळ्यात गुडघाभर चिखलातून वाहतूक करावी लागत होती.यावर्षी मात्र लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, माजी उपसरपंच बाळकृष्ण मुळे,संदिप मुळे यांच्या पुढाकाराने १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतुन रस्तेकामास सुरूवात झाली असुन तब्बल ७५ वर्षानंतर मुळेवस्तीकरांना रस्ता मिळाला असुन अखेर रस्त्याचा पांग फिटला असं बोललं जाते.

वर्षभरापूर्वी रास्तारोको आंदोलन अखेर पावसाळ्यापूर्वी रस्ते कामास सुरुवात :- डॉ.गणेश ढवळे



लिंबागणेश येथील मुळेवस्ती या रस्त्याची दुरावस्था असुन ग्रामस्थांना पावसाळ्यात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो म्हणून रस्ता करण्यात यावा यासाठी ग्रामस्थांनी गेल्यावर्षी दि.०६ जुन २०२३ रोजी लिंबागणेश बसस्थानक येथे मांजरसुंभा ते पाटोदा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते.यावेळी गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, शाखा अभियंता वाघ,स्थापत्य अभियंता अरविंद दुबाले, तहसिल प्रशासनाचे मंडळ अधिकारी वंजारे, तलाठी पोतदार, नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनी विलास हजारे यांनी घटनास्थळी भेट देऊन रस्त्याची पाहणी करत पावसाळ्यापूर्वी रस्ता काम करण्याचे आश्वासन दिले होते.अखेर पावसाळ्यापुर्वी रस्तेकामास सुरूवात झाली असुन रस्त्याचा प्रश्न मिटला आहे.रास्ता रोको आंदोलनात माजी सरपंच कल्याण वाणी, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ,विक्रांत वाणी, श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, महादेव कुदळे अभिजित गायकवाड, पांडुरंग वाणी, संजय घोलप, वैजनाथ भोसले, रामकिसन गिरे आदि ग्रामस्थ सहभागी होते.



बीड ।प्रतिनिधी

येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २६ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यापीठ ध्वजाचे प्राचार्य महेंद्र गौशाल यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे गीत वाजवण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल,डॉ.रत्ना क्षीरसागर, डॉ. द्यानेश्वर जोशी डॉ. शहापूरे तसेच आकाश पाचंगे यांच्यासह विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT